अपंगत्वाला नं जूमानणारा शास्त्रज्ञ

व्यक्ति विशेष

# स्टीव्हन हॉकिंग

❒ डॉ.जयंत नारळीकर, मुंबई

१९६३ सालची हकीगत, केंब्रिज येथील किंग्स कॉलेजमधले माझे एक सहकारी गप्पा मारता मारता सहज बोलून गेले. तुम्हाला माहित आहे तो स्टीव्हन हॉकिंग ? डॉक्टरांनी नूकतेच निदान केलेय की त्याच्या आयुष्याची फारतर दोन वर्षे उरली असतील.

हे ऐकून मला धक्काच बसला. दोन वर्षापूर्वी स्टीव्हनची आणि माझी भेट पहिल्यांदा झाली तेव्हा आम्ही दोघे रॉयल ग्रीनिच ऑब्झर्वटरीत उन्हाळ्याच्या सुट्टीतले विद्यार्थी म्हणून काम करत होतो. इंग्लंडमधला उन्हाळा म्हणे रमणीय, मजा करण्याचा काळ. विद्यार्थी म्हणून आम्हाला वेधशाळेत थोडे काम दिले जाई. रहायची सोय तिथल्या पुरातन किल्ल्यात. मोकळा वेळ भरपूर ईस्टबोनं, ब्रायटन सारख्याकिनाऱ्याकडे आमच्या सहली होत, शिवाय किल्ल्याभावेती विस्तीर्ण मोकळ्या जागेत हिरवळीवर खेळायची सोय असे. टेनिस, क्रोके, टेबलटेनिस बिलियर्डस्चीही व्यवस्था होती. ह्या सर्वात इतर विद्यार्थ्यांप्रमाणे स्टीव्हनसुध्दा भाग घेत असे.

१९६१ च्या त्या उन्हाळ्यात स्टीव्हनमध्ये काही शरीरिक व्यंग असेल असे कोणालाही वाटले नसते. बोलतांना त्याचे स्वर किंचित अस्पष्ट असत. पण समाजाच्या उच्च स्तरावरचा इंग्रज असेच बोलतो. त्यामुळे मला त्यात विशेष काही वाटले नाही. बहुतेक एखाद्या मोठ्या पब्लिक स्कूलचे संस्कार स्टीव्हनवर घडले असावेत असाच माझा समज झाला. कधी कधी अशा बोलण्यातून बोलणारा स्वत:ला मोठा समजतो असा गैरसमज ऐकणाऱ्याचा होई. असा गैरसमज स्टीव्हनबद्दल माझाच नव्हे तर माझ्या इंग्रज मित्रांचाही झाला. हे ऑक्सफर्डवाले असेच आढ्यताखोर असतात असे आम्ही स्वत:चे समाधान करुन घेत असू.

१९६२ मध्ये ऑक्सफर्डमधून डिग्री घेऊन डॉक्टरेटच्या शिक्षणासाठी स्टीव्हन केंब्रिजमध्ये आला तेव्हा मी त्याला रोज भेटत असे. त्याची बोलण्याची पध्दत तशीच होती. शब्द जिभेवरुन घसरतात असा भास होई. पण त्याला पुढे ग्रासणाऱ्या अपंगत्वाचे हे पहिले पाऊल आहे हे आम्हाला कोणाला माहित नव्हते. म्हणून ती बातमी ऐकून मला फार आश्चर्य वाटले.

नंतर असे कळले की जवळ जवळ जन्मापासून स्टव्हनमध्ये विकृती होती. लहानपणी रोगप्रतिबंधक लशींमधल्या कुठल्यातरी औषधातील दोषातून ही विकृती आली असे कळले. त्याचा परिणाम स्टीव्हनला तरुणपणी जाणवू लागला. मेंदूतर्फे मज्जातंतूंवर होणारे नियंत्रण हळूहळू शिथिल होउ लागले. त्याचा आवाज प्रथम ह्या नियंत्रणातून सुटला. अस्पष्ट बोलण्यामागे आढ्यता नव्हती.

पण ह्याच काळात स्टीव्हनमध्ये झपाट्याने बदल होत गेले. चालताना पावले अडखळू लागली. त्याने आपला पीएच्.डी चा प्रबंध पुरा केला आणि त्यापुढचे संशोधन चालू ठेवले. त्याच्या प्रबंधासाठी त्याला त्याच्या मार्गदर्शकांची काही फार मदत लागली नाही. आणि पदव्युतर संशोधन तर त्याने स्वत:च्याच हिंमतीवर चालू ठेवले.

१९६६ - ६७ च्या काळात आइन्स्टाइनच्या रिलेटिव्हीटी थियरीमधला एक गहन प्रश्न सोडवण्यात स्टीव्हनने यश मिळवले. ह्या काळात त्याचे हात लिहिण्याचे काम करेनासे झाले, म्हणून त्याने सर्व गणित न लिहिता मेंदूतच करायचा सराव केला. त्याचे काही जवळचे सहकारी त्याचे अस्पष्ट बोलणे ऐकून त्याने डोक्यातच सोडवलेले गणित कागदावर उतरवतात आणि ते तपासतात. ते गणित अचूक ठरते ह्या बद्दल आता त्यांना आश्चर्य वाटत नाही.

होय ! स्टीव्हन अजून जिवंत आहे. आणि शरिराने पूर्ण दगा दिला असला तरी मेंदूच्या जोरावर त्याची संशोधनातील आगेकूच चालूच आहे. १९६९ - ७३ च्या काळात कृष्ण विवरांवर त्याने महत्वाचे सिध्दांत मांडले. कृष्ण विवरांपासून ऊर्जा बाहेर पडू शकते हा अनपेक्षित निष्कर्ष त्याने १९७४ मध्ये काढला व तो हॉकिंग इफेक्ट ह्या नावाने ओळखला जातो. त्याच्या संशोधनाबद्दल त्याला अनेक बहुमान मिळालेत. रॉयल सोसायटीने सभासदत्व, केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक इत्यादी.

स्टीव्हनच्या यशामागे त्याची स्वत:ची जिद्द ज्याप्रमाणे महत्वाची त्याचप्रमाणे त्याला त्याच्या पत्नीने दिलेले सहकार्य सुध्दा. १९६४ - ६५ च्या काळात जेन वाइल्ड आणि स्टीव्हनची मैत्री झाली. आणि तिचे विवाहात रुपांतर झाले. स्टीव्हनच्या वाढत्या अपंगत्वाचे चित्र डोळ्यासमोर असतांना त्याला आयुष्यभर साथ देण्याचा त्याच्या पत्नीचा निर्णय हा तितकाच जिद्द दाखवणारा नव्हे का? त्यांना दोन निरोगी अपत्ये आहेत. एक मुलगा, एक मुलगी.

ह्या वर्षी स्टीव्हनने वयाची ४० वर्षे पूर्ण केली. डॉक्टरांची भविष्या वाणी तर त्याने खोटी ठरवलीच पण अपंगत्वाला न जुमानता विज्ञानाच्या मूलभूत क्षेत्रात महत्वाची कामगिरी करुन दाखवली. शरीराने दगा दिला असला तरी जोपर्यंत मेंदू धडधाकट आहे. तोपर्यंत त्याला कामात जुंपून ह्यापुढेही नेत्रदिपक कामगिरी स्टीव्हन हॉकिंगकडून होणार यात शंका नाही.